**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.**

क. पुविमं/माध्यमिक/क/अतिविलंब 7562
पुणे–411005.
दिनांक–19/12/2024.

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
पुणे/अहमदनगर/सोलापूर

विषय–माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षा मार्च 2024 विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

संदर्भ–.क.रा.मं./परीक्षा–8/5427 दि.14/12/2023.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम 1977 नियम क.46 अन्वये मार्च 2024 मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दिनांक 08/12/2023 रोजी संपुष्टात आली आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारित मुदत संपल्यानंतर (1)श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी तीस दिवसाचा कालावधी वगळून त्या अगोदर प्रतिदिनी रूपये 50/– याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (2) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरू होणार आहे, त्यातील सुरूवातीच्या 15 दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रतीदिन रू.100/– विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या 15 दिवसांकरिता व परीक्षेच्या अगोदरच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि.29/02//2024 पर्यंत रू.200/–प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारून आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू. 50/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत रू.100/– (प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत ( रू. 200/–प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षा | सोमवार दिनांक 18/12/2023 ते सोमवार दिनांक 15/01/2024 | मंगळवार दिनांक 16/01/2024 ते सोमवार दिनांक 05/02/2024 | मंगळवार दिनांक 06/02/2024 ते गुरूवार दिनांक 29/02/2024 |

सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळेने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची printout व आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसापर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क रोखीने अथवा चलनाने भरण्यात यावे. सदर शुल्क प्राप्त झाल्यानंतरच अर्ज ग्राहय धरण्यात येईल.

विद्यार्थ्याचे अतिविलंबाचे आवेदनपत्र ऑनलाईन सादर केल्यानंतर त्या दिवशी अथवा लगतच्या दुसऱ्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) प्रि–लिस्ट प्रत, गुणपत्रकाची प्रमाणित छायाप्रत, विद्यार्थ्याचे हमीपत्र ,परिशिष्ट–अ सबळ कारणाचा पुरावा इ. कागदपत्रासह व मुख्याध्यापकांची स्पष्ट शिफारस नमूद करून प्रस्ताव परिपूर्णरित्या विभागीय मंडळ कार्यालयास समक्ष सादर करण्यात यावा. त्यानंतरच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर न केल्यास विदयार्थ्याच्या संभाव्य नुकसानीस शाळाप्रमुख जबाबदार राहातील याची नोंद घ्यावी.

मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षाकेंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब आपल्यामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सोबत–परिशिष्ट–अ आणि विद्यार्थ्याचे हमीपत्र

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीस्तव
1.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे.
2.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा पुणे/अहमदनगर/सोलापूर
3.लेखाशाखा पुविमं,पुणे

# परिशिष्ट-अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नाव: ----------------------------

विभागीय मंडळाचे नाव: ------------ विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांक: --------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

इ.१० वी

१. विद्यार्थ्यांचे नाव : ----------------------------------------

२. शाळेचे नाव व पत्ता : ----------------------------------------

३. शाळेचा सांकेतांक क्रमांक : ------------------------------------

४. विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार — ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती — ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५. उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१. ------------------------ २. ------------------------

३. ------------------------ ४. ------------------------

८. ------------------------------------------------

(याबाबत नियमित विद्यार्थ्यांची हजेरी तपासून सदरचे कारण ग्राहय धरावे.)

६. शाळा प्रमुखांची शिफारस :- ----------------------------------------

----------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : --------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम -----------

क) दंड कशाप्रकारे भरला - रोख/चलन क्रमांक ----------------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ----------------------------------------

----------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का



Scanned with OKEN Scanner

दिनांक–

## विद्यार्थ्याने द्यावयाचे हमीपत्र

मी कुमार / कुमारी................................................

शाळा सांकेतांक कमांक (                    ) या शाळेत शिक्षण घेत आहे.मी अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिलिंब शुल्कानुसार आवेदनपत्र भरले असल्यामूळे विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच माझा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तर त्यास माझी काही हरकत राहणार नाही.

विद्यार्थ्याची स्वाक्षरी